मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
मुंबई/ पालघर | मुंबई, बुधवार, २ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १०२ | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये
Email : vrittamanas1@gmail. com

## एसटी बसमध्ये 'शिवनेरी सुंदरी'

**मुंबई:** विमानातील एअर होस्टेसच्या धर्तीवर आता एसटीच्या ई- शिवनेरी बसमध्ये 'शिवनेरी सुंदरी' नेमण्याचा महत्त्वकांक्षी निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. या योजनेमुळे प्रवाशांच्या प्रवासाचा दर्जा उंचावेल अशी भावना व्यक्त केली जात आहे. मुंबई- पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या ई-शिवनेरी बसमध्ये प्रवाशांना मदत करण्यासाठी हवाई सेवेच्या धर्तीवर आदरातिथ्य व्यवस्थापनाची सेवा देणारी परिचारिका (शिवनेरी सुंदरी) नेमण्यात येणार आहे. प्रवाशांच्या तिकिटावर कोणताही अधिभार न लावता प्रवाशांना चांगल्या सेवा सुविधा देऊन गुणात्मक सेवेचा दर्जा उंचावेल अशी अभिनव योजना भविष्यात सुरू करण्यात येईल, अशी माहिती एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी दिली.



## चीनसोबत स्थिती स्थिर, सामान्य नाही!

पान 8

## म ह त्त्वा चे

### 'मरे' विस्कळीत, ऐन गर्दीच्या वेळी खोळंबा



**ठाकुर्ली आणि कल्याण रेल्वे स्थानकादरम्यान तांत्रिक बिघाड**

**मुंबई :** मुंबई लोकल थांबली तर लाखो प्रवासी एकाच ठिकाणी स्तब्ध होतात. लाखो नागरीक हे मुंबई लोकलच्या वेळापत्रकावर अवलंबून असतात. त्यामुळे मुंबई लोकलची वाहतूक कोलमडली तर त्याचा मोठा फटका या लाखो प्रवाशांना बसतो. आजदेखील असाच प्रकार मध्य रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बसला आहे. मध्य रेल्वेच्या मार्गाने धिम्या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आज प्रचंड मनस्तापाला सामोरं जावं लागत आहे. कारण रेल्वे वाहतुकीचा मोठा खोळंबा या मार्गावर झाला आहे. ठाकुर्ली आणि कल्याण रेल्वे स्थानकादरम्यान तांत्रिक बिघाड झाल्यामुळे लोकल ट्रेनच्या लांबच्या लांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या मनस्तापाला सामोरं जावं लागत आहे. संध्याकाळची वेळ असल्यामुळे अनेक प्रवासी हे आपल्या कार्यालयातून घरी जाण्यासाठी निघतात. त्यामुळे या लाखो प्रवाशांना या वाहतूक खोळंबाचा फटका बसला आहे.

### गोव्यातील सावंत-राणे वाद पोहोचला दिल्लीत

**पणजी :** अलिकडे राणे यांनी बेरोजगारांसंदर्भात केलेल्या विधानावरून ते चर्चेत आले होते. राज्यातील भू रूपांतर करण्यास कोणी परवानगी दिली, यावरूनही दोन्ही नेत्यांत वाद आहेत. या पार्श्वभूमीवर दिल्लीत बैठक बोलावली गेल्याने विषयीच्या तर्क-वितर्कांना उधाण आले होते. दिल्लीत सोमवारी रात्री भाजपचे (BJP) राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत नेमके काय ठरलं, याविषयीचे गूढ अद्याप कायम आहे. या बैठकीत सहभागी झालेले मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि आरोग्य मंत्री विश्वजीत राणे यांनी सविस्तर माहिती देण्यास नकार दिला. त्यामुळे या बैठकीत फार मोठी चर्चा झाल्याचे अनुमान राजकीय वर्तुळातून काढले जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हेही या बैठकीला उपस्थित होते. अलीकडे राणे यांनी बेरोजगारांसंदर्भात केलेल्या विधानावरून ते चर्चेत आले होते.

### अभिनेता गोविंदाचे 'मिसफायर'

**मुंबई :** बॉलीवूड अभिनेता गोविंदा याच्याबाबबत एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. अभिनेत्याच्या पायाला थेट गोळी लागली आहे. गोविंदाच्या हातातील बंदुकीतून मिसफायर झाल्याची माहिती समोर येत आहे. मुंबईत पहाटे 5 वाजताच्या सुमारास ही घटना घडली. यामुळे एकच खळबळ उडाली आहे. चाहते देखील या बातमीमुळे चिंतेत पडले आहेत. गोविंदा घराबाहेर जात असताना त्याच्याकडे परवाना असलेली बंदुक तपासून पाहत होता. त्याचवेळी चुकून बंदुकीतून गोळी सुटली आणि त्याच्या पायाला लागली. या घटनेनंतर त्याला तातडीने मुंबईतील क्रिटीकेअर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

# यंदा महायुतीचं तर 2029 ला एकट्या भाजपचं सरकार येईल !

**प्रतिनिधी**
**मुंबई**

जे सरकार काम करतं तेच निवडणुक जिंकतात, देशात आपण सलग तिसरे सरकार बनवले. आता आपली निराशा झटकून टाका, कोणत्याही सर्व्हेचा विचार करू नका असं सांगत महाराष्ट्रात महायुतीचेच सरकार येईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते अमित शाह यांनी व्यक्त केला. यंदा राज्यात महायुतीचे सरकार येईल, पण 2029 साली एकट्या भाजपच्या जीवावर सत्ता आणायची आहे, असंही अमित शाह यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केलं. अमित शाह हे मुंबईच्या दौऱ्यावर असून आज त्यांनी केलेल्या या फर्मानामुळे राजकिय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

## 'शाही' फर्मानामुळे खळबळ



महाराष्ट्रात महायुतीचं सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे, असं अमित शाह म्हणाले. महाराष्ट्रात सत्ता आल्यास समान नागरी कायदा आणण्यापासून आपल्याला कोणीही रोखू शकत नाही, असंही अमित शाह म्हणाले.

अमित शाह म्हणाले की, गेल्या 60 वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच सलग तीन वेळा सरकार बनविण्याचा विक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केला. महाराष्ट्राची निवडणूक देशाची दशा आणि दिशा बदलणारी निवडणूक आहे आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणूक महायुती जिंकणार. महाराष्ट्रात मतदानाची टक्केवारी वाढवा, विजय महायुतीचाच होईल. महाराष्ट्रात महायुतीचं सरकार येणार हे निश्चित आहे. महाराष्ट्रात महायुतीला रोखण्याची ताकद कुठल्याही पक्षात नाही.

भाजप राज्य करण्यासाठी सत्तेत नाही तर विचारधारेवर काम करण्यासाठी सत्तेत आहे, असं सांगत अमित शाह म्हणाले की, राम मंदिर, 370 हटवणं हे काम करण्यासाठी भाजप सत्तेत आली. पान 8 वर

### *एका पक्षाच्या बळावर सरकार येऊ शकत नाही!*



***बीड ।*** *अमित शाह यांच्या आजच्या विधानावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार यांची जनसन्मान यात्रा आज बीड जिल्ह्यात पोहोचली. यावेळी मोठी रॅली काढण्यात आली होती. यानंतर अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले, प्रत्येकाला आपला पक्ष वाढवण्याचा अधिकार आहे. 1985 नंतर जवळपास 40 वर्षे एका पक्षाचं सरकार कधीचं आलं नाही. इतर राज्यांची आणि महाराष्ट्राची परिस्थितीत वेगळी आहे. भाजपला त्यांचा पक्ष वाढवण्याचा अधिकार आहे. आजच्या परिस्थितीत एका पक्षाच्या बळावर सरकार येऊ शकत नाही.*

## मंत्रालयाबाहेर सोयाबीन फेकून सरकारचा निषेध, हमीभावासाठी शेतकरी आक्रमक

**प्रतिनिधी**
**मुंबई**

सोयाबीनला हमी देण्यात यावा, या मागणीसाठी राज्यातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. सोयाबीनच्या हमीभावासाठी शेतकऱ्यांनी मुंबई आणि सोलापूरात आक्रमक पवित्रा घेतला आहे. मुंबईत सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी शरद पवार गटाच्या नेतृत्वात सोयाबीनच्या भावावरून मंत्रालयाबाहेर सोयाबीन फेकून सरकारचा निषेध व्यक्त करत सोयाबीनला 6 हजार रुपये हमीभाव द्यावा, अशी मागणी केली आहे. तर सोलापुरात काँग्रेसच्या खासदार यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी मोर्चा काढला आहे.



सोयाबीनला सहा हजार रुपये प्रति क्विंटल हमी भाव मिळावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. या मागणीसाठी शेतकऱ्यांकडून अनेकवेळा सरकारला निवेदने देखील देण्यात आली आहेत. मात्र यावर अद्याप कोणताही तोडगा न निघाल्यामुळे शेतकरी संतप्त झाले आहेत. सोयाबील उत्पादक शेतकऱ्यांनी सोयाबीनच्या हमीभावासाठी मंगळवारी मुंबई येथे मंत्रालयाबाहेर आंदोलन केले. यावेळी संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आक्रमक होत मंत्रालयाबाहेर सोयाबीन फेकले. सरकारने शेतकऱ्यांचा अंत पाहू नये, सोयाबीनला सहा हजार रुपये पान 8 वर

# बदलापूर शाळेच्या ट्रस्टींना अद्याप अटक का केली नाही?

**प्रतिनिधी**
**मुंबई**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणात उच्च न्यायालयाने आज पुन्हा एकदा शिंदे सरकार आणि पोलिसांना फटकारले. ज्या शाळेत दोन मुलींवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली, त्या शाळेच्या ट्रस्टींना अद्याप अटक का केली नाही?, पोलीस नेमकी कसली वाट पाहत आहेत?, आरोपी ट्रस्टींना अटकपूर्व जामीन मिळावा, याची वाट पाहताय का?, असा प्रश्नांचा भडीमार करीत न्यायालयाने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले.



**पोलिसांच्या निष्क्रियतेवर हायकोर्ट पुन्हा संतापले**

दोन चिमुकल्या शाळकरी मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने सुमोटो याचिका दाखल करून घेतली. या याचिकेवर आज न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. यावेळी सरकार आणि बदलापूर प्रकरणात स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाच्यावतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली. त्यांनी तपासाबाबत दिलेल्या माहितीवर खंडपीठाने असमाधान व्यक्त केले. तपास योग्यप्रकारे सुरु असल्याचा दावा महाधिवक्त्यांनी केला. मात्र शाळेचे दोन ट्रस्टी अद्याप मोकाट असल्याचे निदर्शनास आल्यानंतर खंडपीठाने पोलिसांच्या कार्यपद्धतीचा समाचार घेतला. तुम्ही त्या दोन्ही ट्रस्टींना अद्याप अटक का केली नाही? एका गंभीर गुन्ह्यात पोलीस इतके ढिम्म कसे राहतात? असा संतप्त सवाल खंडपीठाने केला. याचवेळी तपासात आतापर्यंत काय काय केले, याचा सविस्तर तपशील असलेले प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश पोलिसांना दिले. याप्रकरणी २३ ऑक्टोबरला पुढील सुनावणी होणार आहे.

### *शाळेच्या ट्रस्टींचा अटकपूर्व जामिन अर्ज फेटाळला*

*बदलापूरच्या शाळेच्या चेअरमन आणि सचिवाने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावरही आज एकलपिठापुढे सुनावणी झाली. आरोपी तुषार आपटे आणि उदय कोतवाल या दोन्ही आरोपींचा अर्ज न्यायमूर्ती आर. एन. लड्ढा यांनी फेटाळून लावला. आरोपींना मुलींवरील लैंगिक अत्याचाराची पूर्ण कल्पना होती. त्यांनी त्या प्रकाराबाबत तातडीने पोलिसांना कळवायला हवे होते, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने दोन्ही आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला.*

## BRS ची प्रदेश शाखा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत होणार विलीन

**प्रतिनिधी**
**मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वर्तुळात मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. अशातच महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर भारत राष्ट्र समिती पक्षाचे अध्यक्ष आणि तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांना मोठा धक्का बसणार आहे. महाराष्ट्रातील प्रदेश बीआरएस पक्ष आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीत विलिन होणार असल्याची माहिती समोर येत आहे.

राज्यातील बीआरएसचे सर्व पदाधिकारी शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत. येत्या 6 तारखेला पुण्यात शरद पवारांच्या उपस्थितीत बीआरएसच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा पक्ष प्रवेश पार पडणार आहे. विधानसभा निवडणुकांपूर्वी शरद पवारांची मोठी खेळी असल्याचं बोललं जात आहे. काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या राज्यातील लोकसभा निवडणुकांपूर्वी बीआरएस पक्ष महाराष्ट्रात दाखल झाला होता. मोठं शक्तिप्रदर्शन करत भारत राष्ट्र समिती पक्षाचे अध्यक्ष आणि तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी नागपुरात पक्ष कार्यालयाचं उद्घाटन केलं होतं. पण, अवघ्या काही महिन्यांतच महाराष्ट्रातील प्रदेश बीआरएस पक्ष आता गाशा गुंडाळणार असल्याचं चित्र पाहायला मिळतंय. येत्या 6 ऑक्टोबरला शरद पवारांच्या उपस्थितीत बीआरएस पक्षातील सर्व पदाधिकारी थोरल्या पवारांच्या पक्षात विलिन होणार असल्याची माहिती मिळत आहे.

## संगमेश्वरात तीन अल्पवयीन विद्यार्थिनींवर अत्याचार

### अनधिकृत वसतीगृहात घडला प्रकार

**प्रतिनिधी**
**संगमेश्वर**

राज्यात अल्पवयीन मुलींवरील अत्याचारांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस येत आहेत. अशातच संगमेश्वर तालुक्यातील एका अनधिकृत वस्तीगृहात राहणाऱ्या तीन विद्यार्थिनींवर संस्थेच्या अध्यक्षांनीच अत्याचार केल्याचे समोर आले आहे. संस्थेच्या ग्रंथपाल महिलेने दिलेल्या तक्रारीवरून रत्नागिरी शहर पोलिसांनी संस्था अध्यक्ष नयन मुळये (वय 67) त्यांचा मुलग प्रथमेश मुळये (वय36 ) शाळेचे मुख्याध्यापक संजय मुळये यांच्याविरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 67 वर्षीय संस्था चालकावर अशा प्रकारचा गुन्हा दाखल झाल्यामुळे जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

शाळेच्या ग्रंथपाल महिलेने रत्नागिरी शहर पोलीस स्थानकात दिलेल्या तक्रारीनुसार संगमेश्वर तालुक्यातील मुलींचे वसतिगृह अनधिकृतपणे चालवले जाते. गणेश उत्सवा दरम्यान शाळेला सुट्टी असल्याने वसतिगृहात राहणाऱ्या एकूण 23 मुलींपैकी 20 मुली गणेशोत्सवासाठी आपल्या गावी गेल्या होत्या. तर यातील तीन मुली सुरुवातीचे काही दिवस तक्रारदार यांच्या घरी राहायला आल्या होत्या. मात्र तक्रारदार या कामानिमित्त पुणे येथे जाणार असल्याने तिन्ही मुलींनी संस्थाचालक नयन मुळये त्यांच्याकडे राहण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार गणेशोत्सव संपेपर्यंत त्या मुली त्यांच्याकडेच राहत होत्या. या कालावधीत नयन मुळे यांच्या राहत्या घरी मुलींचा विनयभंग करण्यात आला. ही गोष्ट सुट्टी संपल्यानंतर मुलींनी ग्रंथपालांना सांगितली. त्यानुसार त्यांनी तक्रार दाखल केल्याचे म्हटले आहे. पोलिसांनी बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा पोस्को अंतर्गत संस्था अध्यक्ष नयन मुळये (वय 67) त्यांचा मुलग प्रथमेश मुळये (वय 36) शाळेचे मुख्याध्यापक संजय मुळये यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित घटना गणेशोत्सवाच्या काळात घडली असून तीन पैकी एक मुलगी महाविद्यालयात व अन्य दोन मुली शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत.

## कळव्यात शालेय विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा

### 40 जणांवर रुग्णालयात उपचार सुरु

**प्रतिनिधी**
**ठाणे**

कळवामधील मनिषा नगर भागातील सहकार विद्या प्रसारक मंडळ शाळेतील इयत्ता पाचवी आणि सहावीत शिक्षण घेत असलेल्या तब्बल 40 विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याची घटना समोर आली आहे. या सर्व विद्यार्थ्यांवर ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरु असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली आहे.



शासनाकडून देण्यात येणारे शालेय पोषण आहार या शाळेत देखील दिले जात होते. मंगळवारी दुपारी मनिषा नगर दत्तवाडी सहकार विद्या प्रसारक मंडळातील विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. त्यात भात, डाळ आणि मटकीच्या उसळी आदींचा समावेश होता. हे अन्न देत असतांनाच काही विद्यार्थ्यांना त्याच्या वासानेच मळमळल्यासारखे झाले. तर काहींनी अन्न खाल्यानंतर त्यांना उलटी, पोटदुखी आदींचा त्रास सुरु झाला. त्यानंतर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना तत्काळ महापालिकेच्या छत्रपती शिवाजी रुग्णालयात हलविण्यात आले. हे अन्न खाल्याने 40 विद्यार्थ्यांना त्यातून विषबाधा झाल्याचा अंदाज रुग्णालय प्रशासनाने वर्तविला आहे. त्यातही शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या घराच्यांना सायंकाळच्या सुमारास याची माहिती दिल्याने विद्यार्थ्यांचे पालकांनी देखील रुग्णालयात धाव घेतली. विषबाधा झालेले विद्यार्थी हे इयत्ता पाचवी आणि सहावीत शिकणारे असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली. तर या पूर्वी देखील येथे देण्यात येणाऱ्या अन्नातून झुरळ, किडे आढळून आल्याचा दावा माजी नगरसेवक मिलिंद पाटील यांनी केला आहे.

दरम्यान, कळवा रुग्णालयात दाखल झालेल्या 40 विद्यार्थ्यांवर रुग्णालय प्रशासनाकडून उपचार सुरु असून अन्नातून विषबाधा झाल्यानेच त्यांना हा त्रास झाला असावा असा अंदाज असल्याची माहिती रुग्णालयातील डॉ. अनिरुद्ध माळगावकर यांनी सांगितले. तूर्तास सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## काळ्या आईचे पांग फेडण्याचा प्रयत्न

### - मुख्यमंत्री शिंदे



**प्रतिनिधी**
**सांगली**

टेंभू विस्तारीत प्रकल्पातील घटक कामांच्या भूमिपूजनातून काळ्या आईचे पांग फेडण्याचा प्रयत्न केला आहे. या योजनेतून लाभक्षेत्रातील हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. त्यामुळे या योजनेच्या सहाव्या टप्प्यास दिवंगत आमदार अनिल बाबर यांचे नाव देऊ, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केले.

टेंभू विस्तारीत प्रकल्पातील सांगली जिल्ह्यातील तीन घटक कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यानंतर विटा येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी टेंभू योजनापुर्तीसाठी दिवंगत आमदार अनिल बाबर यांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगितले. कार्यक्रमास राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई, पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या घटक कामांमध्ये टेंभू विस्तारीत प्रकल्पातील सांगली जिल्ह्यातील टप्पा क्र. 6, पळशी उपसा सिंचन योजना टप्पा क्र. 5 वितरण व्यवस्था व कामथ गुरूत्व नलिका यांचा समावेश आहे.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सांगली जिल्ह्यातील टेंभू, म्हैसाळ योजनांना भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. यामुळे त्या क्षेत्रातील जमीन ओलिताखाली येऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे, असे ते म्हणाले. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी टेंभू विस्तारित प्रकल्पांतील विविध कामांची माहिती घेतली.

## काँग्रेस नेते वाघ, RSSमध्ये दम नाही!

### हे लोक मला पाहून लपतात; मी मोदी-भाजपचा द्वेष करत नाही...

**प्रतिनिधी**
**चंदीगढ**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची हरियाणा विजय संकल्प यात्रा दुसऱ्या दिवशीही सुरूच आहे. सकाळी 11.30 च्या सुमारास झज्जरमधील बहादूरगड येथून यात्रेला सुरुवात झाली. जी सोनीपतची 5 सर्कल कव्हर करेल आणि संध्याकाळपर्यंत गोहानाला पोहोचेल. या भेटीदरम्यान राहुल यांनी सोनीपतमध्ये जाहीर सभेला संबोधित केले. ते म्हणाले की, काँग्रेसचे नेते 'शेर' आहेत पण आरएसएसच्या लोकांमध्ये दम नाही. मला पाहून हे लोक लपतात. मी लोकसभेत भाषण देतो तेव्हाही पंतप्रधान नरेंद्र मोदी बाहेर पडतात. मी मोदी, भाजपचा द्वेष करत नाही.



गुजरातमधील अदानी पोर्टमध्ये ड्रग्ज जप्त करण्यात आले आणि त्यावर काय कारवाई करण्यात आली हे हरियाणातील लोकांना सांगा, असे राहुल यांनी पंतप्रधान मोदींना सांगितले. राहुल गांधी यांनी हरियाणातील भाजप सरकारच्या परिवार पहचान पत्राचे (पीपीपी) वर्णन परिवार परेशान पत्र असे केले. काल राहुल गांधींची यात्रा अंबाला येथील नारायणगड येथून सुरू झाली आणि कुरुक्षेत्रातील ठाणेसरमध्ये संपली.

बघा आजकाल काय होतंय, मी रस्त्यावर जातो आणि मला दोन प्रकारचे लोक भेटतात. कोणी हसत असेल तर तो काँग्रेसवासी आहे. तर RSSचे लोक स्वतःला लपवू शकत नाहीत. ते वेश बदलून येतात. घाबरून आमचे लोकही तिकडे पळून गेले. ते तिथे हसू शकत नाही. नरेंद्र मोदींसमोर शांतपणे बसावे लागते. तुम्ही बसले आहात, सगळे हसत आहेत. अमित शहांचं भाषण, नरेंद्र मोदींचं भाषण हे सगळे असेच बसतात. ही पार्टी म्हणजे प्रेमाची पार्टी आहे.

मी नरेंद्र मोदी, भाजपचा द्वेष करत नाही. हा विचारधारेचा लढा आहे. हा काँग्रेस पक्षाचा विचार आहे. तुम्ही आम्हाला वाटेल तेवढे शिव्या द्या, लाठ्या-काठ्या मारा. पण आम्ही द्वेष करणार नाही. देश द्वेषावर नव्हे तर प्रेमावर उभा आहे हे आपण जाणतो. ज्या दिवशी इथे प्रेमाचे सरकार येईल त्या दिवशी तुम्हाला अमेरिकेला जावे लागणार नाही. इथे सर्व काही मिळेल. राहुल म्हणाले, कधी कधी आमचे शेर एकमेकांशी भांडतात. मग माझे काम या वाघांना एकत्र आणण्याचे आहे. मला माहीत आहे की काहीही झाले तरी काँग्रेसचे सर्व कार्यकर्ते वाघ आहेत.

# वाहतूक कोंडीच्या विरोधात भूमिपुत्र संघटनेचे आज संविधानिक आंदोलन

## विद्यार्थ्यांच्या परीक्षांवर होणाऱ्या परिणामाबद्दल चिंता

प्रतिनिधी
■ वसई

मुंबई-आमदाबाद महामार्ग आणि कामण-अंजुर फाटा-भिवंडी रस्त्यावर वारंवार होणारी वाहतूक कोंडी ही स्थानिक नागरिकांसाठी आणि विशेषतः विद्यार्थ्यांसाठी गंभीर समस्या बनली आहे. या वाहतूक कोंडीमुळे प्रवासात होणारा विलंब आणि त्यातून उद्भवणारे आर्थिक नुकसान ही चिंतेची बाब आहे. याशिवाय, परीक्षा तोंडावर येऊन ठेपलेल्या असताना विद्यार्थ्यांना या कोंडीचा मोठा फटका बसत आहे, ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

वारंवार होणारी वाहतूक कोंडी ही महामार्गाच्या कॉंक्रिटीकरण आणि अन्य किरकोळ कारणांमुळे अधिक तीव्र झाली आहे. स्थानिक भूमिपुत्र रोजगार हक्क संरक्षण समितीने प्रशासनाला या समस्येबाबत वेळोवेळी सूचना दिल्या होत्या, मात्र प्रशासनाकडून कोणतेही ठोस पाऊल उचलले गेले नाही. परिणामी स्थानिकांच्या आर्थिक हानीसोबतच विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर याचा गंभीर परिणाम होतो आहे.या परिस्थितीला वाचा फोडण्यासाठी आणि प्रशासनाच्या उदासीनतेला विरोध करण्यासाठी आज 2 ऑक्टोबर 2024 रोजी भूमिपुत्र संघटनेतर्फे चिंचोटी येथील क्रांतिवीर बिरसा मुंडा चौकात शांततापूर्ण संविधानिक आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनाद्वारे नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या समस्या मांडण्यात येणार आहेत. भूमिपुत्र रोजगार हक्क संरक्षण समितीचे अध्यक्ष सुशांत पाटील यांनी नायगाव पोलीस ठाण्याला दिलेल्या निवेदनात प्रशासनाने या समस्येकडे लक्ष न दिल्यास भविष्यात आणखी तीव्र आंदोलनाची चेतावणी दिली आहे.

# वसई-विरारमध्ये केंद्र सरकारच्या ई-बसेसवर प्रश्नचिन्ह



■ वसई

डिसेंबर २०२३ मध्ये ओलेक्ट्रा ग्रीनटेक लिमिटेडसह केलेल्या ६२ कोटी ८० लाखांच्या करारानुसार महानगरपालिकेने ४० ई-बसेस खरेदी करणार असल्याची घोषणा केली होती. या ई-बसेससाठी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत निधी देखील उपलब्ध करण्यात आला होता. या प्रकल्पाचे कार्यान्वयन अद्याप अवरुद्ध आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यातील ४० ई-बसेसपैकी १० बसांचे लोकार्पण १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त करण्यात आले होते, पण त्या अद्याप रस्त्यावर धावत नाहीत. या बस आता महानगरपालिकेच्या कार्यालयात धूळ खात पडल्या आहेत, ज्यामुळे त्यांच्या इलेक्ट्रिक बॅटऱ्या चोरट्यांनी चोरल्याचे वृत्त समोर आले आहे.स्वराज अभियानचे अध्यक्ष धनंजय गावडे यांनी प्रशासनाला प्रश्न केला आहे, "या बसेस कार्यरत नसल्यामुळे सामान्य जनतेला या सुविधेपासून वंचित ठेवले जात आहे. केंद्र सरकारच्या निधीचा वापर करून खरेदी केलेल्या बसेस लवकरात लवकर रस्त्यावर का येत नाहीत?" त्यांनी प्रशासनाकडे ई-बसेस तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून सामान्य जनतेला आवश्यक असलेल्या सुविधांचा लाभ मिळावा.आता प्रशासनाकडून या समस्यांचे निराकरण करण्यात येईल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# रामदास आठवले यांनी घेतली भुपेंद्र यादव यांची भेट



प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय पर्यावरण मंत्री आणि महाराष्ट्राचे भाजपचे निवडणूक प्रभारी भुपेंद्र यादव यांची आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी दादर येथील भाजप कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर ही भेट महत्वपूर्ण ठरली .यावेळी ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वात भेटलेल्या शिष्टमंडळात रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर,राज्य सरचिटणीस गौतम सोनावने,मुंबई प्रदेशाअधक्ष सिध्दार्थ कासारे यांचा समावेश होता.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर भाजपचे महाराष्ट्र प्रभारी केंद्रिय मंत्रीना.भुपेंद्र यादव यांच्याशी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांनी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला किमान 12 जागा देण्यात याव्यात असा प्रस्ताव रिपब्लिकन पक्षातर्फे भाजपला देण्यात आला.आगामी विधासभा निवडणुकीबाबत ना.रामदास आठवले आणि ना.भूपेंद्र यादव यांच्यात चर्चा झाली. भाजपचे प्रभारी केंद्रिय मंत्री ना.भुपेंद्र यादव यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याशी चर्चा करून रिपब्लिकन पक्षाला विधानसभा निवडणुकीत चांगल्या जागांचा वाटा देण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले.रिपब्लिकन पक्ष हा भाजपचा सर्वात जुना मित्र पक्ष असुन भाजपला रिपब्लिकन पक्षाने चांगली साथ दिलेली आहे.रिपब्लिकन पक्षाला भाजपने आगामी विधानसभा निवडणुकीत 12 जागा देण्यात याव्यात आणि राज्य महामंडळाची 2 अध्यक्षपदे देण्यात यावीत तसेच राज्यपाल नियुक्त 12 सदस्या पैकी 1 विधान परिषद सदस्यत्व रिपब्लिकन पक्षाला देण्यात यावे. या मागण्या रिपब्लिकन पक्षाच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

आगामी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला 12 जागा मिळण्याची शक्यता निर्माण झाली असुन या मागणीच्या पार्श्वभुमीवर भाजपचे प्रभारी भुपेंद्र यादव यांच्याशी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रिय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांची सकारात्मक समाधानकारक चर्चा झाल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाच्या वतीने देण्यात आली.


### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.



## मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड

निविदेसाठी विनंती- MRVC/S&T/TELE/IRICEN/T/3/2024

**(एक पाकिट ई- प्रोक्योरमेंट निविदा प्रक्रिया)**

**मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लि. (MRVC),** ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन इमारत, मुंबई-४०००२० येथे आहे, यांचे द्वारे **"पुणे येथील इंडियन रेल्वे इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल इंजिनीअरिंग (IRICEN) येथे पुरविलेल्या अतिरिक्त पायाभूत सुविधांमध्ये विविध टप्प्यांत दूरसंचार उपकरणांची तरतूद आणि संवर्धन"**, ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदाचे तपशील आणि निविदा दस्तावेज IREPS वेबसाइट **https://www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहेत। पूर्ण भरलेली ई-निविदा वेबसाईट **https://www.ireps.gov.in** वर जमा करण्याची शेवटची तारीख **०४.११.२०२४ रोजी दु. १५:०० वा. पर्यंत आहे। शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वैबसाईट वर प्रसिद्ध करण्यात येईल.**



## जाहीर सूचना

सर्व जनतेला आमचे अशील श्री. अमर सिंगजी ह्यांच्या वतीने ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की सदनिका क्र. ८०१, बी विंग, धीरज रेसिडेन्सी, गोरेगाव, मुंबई चे भाग प्रमाणपत्र मालक श्री. अमर सिंग आणि श्रीमती रुख्मिणी सिंग ह्यांच्या हरवले आहे आणि गोरेगाव (पश्चिम) येथील बांगूर नगर पोलीस स्टेशन ह्यांच्याकडे कागदपत्रे हरवल्याची तक्रार देखील दाखल करण्यात आली आहे. सदनिकेच्या संदर्भात जर कोणाचाही कोणताही दावा असल्यास वृत्तपत्रामध्ये सूचना प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या आत कळवावे. जर १५ दिवसांनंतर जर कोणीही आले आणि दावा केल्यास मालकांच्या वतीने ते विचारात घेतले जाणार नाहीत.

**सही/-**
**भावना व्ही. जाधव – वकील**
ए २०२, मोरया हाऊस, क्रिस्टल प्लाझा मागे, ऑफ न्यू लिंक रोड अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५३.
**मोबाईल क्र: ९८२१०९९३४९**
ई-मेल: **vibha_vjadhav@yahoo.com**
**ठिकाण:** मुंबई **दिनांक:** ०२/१०/२०२४



## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

### ई-निविदा सूचना

Main Portal : https://mahatenders.gov.in,
MHADA Portal :https://mhada.gov.in

कार्यकारी अभियंता (फ/ उत्तर) विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, सोनावाला बिल्डींग, नं.८, शंकर आबाजी पालव मार्ग, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४, यांचेकडे मुंबई शहर जिल्हा अंतर्गत Deputy District Registar यांचेकडे उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या म्हाडा नोंदणीकृत पात्र मजुर सहकारी संस्थांकडुन एकुण ०१ कामाकरीता बी- १ ( Percentage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

निविदा विक्री आणि स्विकृती दि. ०२/१०/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता सुरु होऊन दि. ०९/१०/२०२४ रोजी संध्याकाळी ०४ वाजता बंद होईल. तांत्रिक बोली दि. १०/१०/२०२४ रोजी दुपारी ४:०० नंतर उघडण्यात येतील. तसेच पात्र निविदाची आर्थिक बोली दि. ११/१०/२०२४ रोजी सकाळी १०.३० नंतर उघडण्यात येतील.

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवले आहेत. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप: १ विस्तृत ई-निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

टिप: २ निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक/ बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

CPRO/A/850 Follow us:@mhadaofficial

**सही/-**
**कार्यकारी अभियंता फ/ उत्तर विभाग**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

म्हाडा MHADA

### ई-निविदा सुचना क्र. ९३/२०२४-२५

कार्यकारी अभियंता [पश्चिम) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे/ सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी/ एमईएस/मुंबई मनहानगरपालिका /सिडको/ रेल्वे/ बीपीटी/एमआयडीसी /एम.जे.पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण २८ कामांकरीता बी-१ (Percantage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरु | ०२/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता |
| २ | निविदा विक्री बंद | ०९/१०/२०२४ दुपारी ३:०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १०/१०/२०२४ दुपारी ३:०५ नंतर |
| ४ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | ११/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

CPRO/A/853

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (प),**
**मुं.झो. सु. मंडळ, मुंबई**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था


## नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेने उघड केले दोन रिक्षा चोरीचे गुन्हे

**वसई :** नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेने हसोबानगरातील चोरीच्या रिक्षा संदर्भात महत्त्वाची यशस्वीता दर्शवली आहे. विपीन सिंग रोडवर राहत्या घरासमोर पार्क केलेली रिक्षा चोरीला गेली होती, ज्याबाबत वाहनाच्या मालकाने नायगाव पोलीस ठाण्यात तक्रार केली. सकाळी रिक्षा गायब झाल्याचे लक्षात येताच, पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. या तपासात मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे ब्रिजेश रामकिशन राजभरला जीवदानी चाळ, नायगाव पूर्व येथे पकडण्यात आले. चौकशीत त्याने दोन रिक्षा चोरीचे गुन्हे कबूल केले.पोलिसांनी त्याच्याकडून दोन चोरीच्या रिक्षा हस्तगत केल्या आहेत.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

### जलअभियंता विभाग
### ई-निविदा सूचना

| | |
|---|---|
| निविदा आयडी क्र. २०२४ | २०२४_एमसीजीएम_१०९७०३२ (नग दर तत्वावर) |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | ए. ई. (एम) डब्ल्यू. डब्ल्यू. शहर – II गोलंजी हिल जलाशय आणि पंपिंग स्टेशन येथे करावयाच्या सुरक्षा व्यवस्थेची देखभाल कामे करण्यासाठी जीआरपी ग्रटिंग प्लटफॉर्म, शिडीचे आरेखन, उत्पादन, पुरवठा आणि बसविण्याचे काम आणि अन्य संबंधित कामे. |
| निविदेचे छाननी शुल्क | रु. ३,८९४.००/- (रु. ३,३०० + १८% जीएसटी) |
| ई-निविदा मूल्य (अंदाजे मूल्य) | लागू नाही |
| बोली सुरक्षा ठेव/ ईरठे | रु. २१,०००/- (ऑन लाईन) |
| पूर्तता कालावधी | ४ महिने (पावसाळयासह) |
| निविदेचे वितरण आणि विक्रीचा दिनांक | ०१/१०/२०२४ रोजी ११.०० वा. पासून |
| निविदेच्या विक्रीसाठी शेवटचा दिनांक आणि वेळ | ०८/१०/२०२४ रोजी दु. १२.०० वा. पर्यंत |
| लिफाफा ए, बी आणि सी चे सादरीकरण (ऑन लाईन) चे सादरीकरण आणि बोली सुरक्षा ठेव स्वीकृती | ०८/१०/२०२४ रोजी १६.०० वा. पर्यंत |
| पूर्व बोली बैठक | सदर निविदेसाठी लागू नाही |
| लिफाफा ए उघडणे | ०९/१०/२०२४ रोजी १६.०५ वा. नंतर |
| लिफाफा बी उघडणे | १०/१०/२०२४ रोजी १६.१० वा. नंतर |
| लिफाफा सी उघडणे | १७/१०/२०२४ रोजी १५.०० वा. नंतर |
| संकेतस्थळ | https://mahatenders.gov.in |
| संपर्क व्यक्ती | १ श्रीमती जे. बी. महाजन (एस ई): ९९३०३२६०४०८<br>२ श्री. पी. टी. शिंदे (ए ई): ९९३०२६०५०९ |
| पत्रव्यहरासाठी पत्ता: | कार्यकारी अभियंता (देखभाल) मीटर |
| | कार्यशाळा ह्यांचे कार्यालय, बृमनपा, ५६६, एन. एम. जोशी मार्ग, एस `ब्रिज` जवळ, भायखळा (प), मुंबई -४०० ०११ ह्यांचे कार्यालय. ई-मेल आयडी: aewwmcity02.he@mcgm.gov.in |
| बोली उघडण्याचे ठिकाण: | कार्यकारी अभियंता (देखभाल) मीटर कार्यशाळा ह्यांचे कार्यालय, बृमनपा, ५६६, एन. एम. जोशी मार्ग, एस `ब्रिज` जवळ, भायखळा (प), मुंबई -४०० ०११ ह्यांच्या कार्यालयामध्ये ऑन लाईन. |

निविदा कागदपत्रे हस्तांतरित करता येणार नाहीत.

बृमनपा कोणतेही कारण न देता कोणताही अर्ज स्विकारण्याचे किंवा कोणताही किंवा सर्व स्विकारलेला अर्ज नाकारण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

पीआरओ/१४८५/जाही/२०२४-२५

**सही/-**
**उप जल अभियंता**
**(देखभाल)**

गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.



## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

### ई- निविदा

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, बी. एम.सी.फ. दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, - / उ .डब्ल्यू. परेल, मुंबई ४०००१२ यांचेकडे म्हाडा सिडको/पी. यू.डी/सी. पी. डब्ल्यू.टी/एम.आय.डी.सी./बी.पी. टी./एम.ई.एस. भारतीय रेल्वे किंवा शासकीय / निमशासकीय संस्थेत इतर संस्थेमध्ये योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी केलेल्या व बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून बी १ फॉर्ममध्ये (टक्केवारी दर] सिलबंद निविदा मागवित आहोत. ज्यांच्या दुरुस्ती कामासाठी स्तंभ क्र. १० मध्ये दर्शविलेल्या योग्य वर्गाच्या पुनर्रचित इमारती खालीलप्रमाणे.

| अनु. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | १% इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कोऱ्या निविदा विक्रीची रक्कम [विना परतावा रु. १८% GST सह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| १ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली विठठल सदन या पुनर्रचित इमारतीच्या पीव्हीसी पाईप आणि जी. आय. पाईप लाईनची गळतीचे दुरुस्तीचे काम करणे. | ३,८९,६३४/- | ३८९६.०० | ८०००.०० | ५९०.०० | दि. ०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १० महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| २ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली विशेष दुरुस्ती अंतर्गत श्रीहरी या पुनर्रचित इमारतीच्या मेन लाईन ते भूमीगत टाकीची खराब झालेली पाईपालाईन बदलणे गटार व चेंबरची दुरुस्ती तसेच रुम नं. ०९,११३, व ११४ चे गळती व प्लास्टरचे काम करणे. | ८,१६,५६५/- | ९८१६६.०० | १७०००.०० | ५९०.०० | दि.०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ३ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली सदगुरु सदन या पुनर्रचित इमारतीच्या गंजलेल्या जी आय पाईप व पी व्ही सी पाईप बेंड आणि बाहय भिंतीला गळती होत असलेल्या खराब झालेले पी व्ही पाईप ची दुरुस्ताचे काम करणे | ६,८३,५१२/- | ६८३५.०० | १३०००.०० | ५९०.०० | दि.०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ४ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली कल्पतरु या पुनर्रचित इमारतीच्या खोली आणि जिन्याला प्लॅस्टर व रंगरंगोटी काम करणे. | ९,८८,३०६/- | ९८८३.०० | २००००.०० | ५९०.०० | दि.०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ५ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली गुलशन व्हिला या पुनर्रचित इमारतीच्या टेरेसचे जलरोधकाचे काम करणे. | ९,९७,४१३/- | ९९७४.०० | २००००.०० | ५९०.०० | दि.०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ६ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली बसेरा \| अदम मिस्त्री लेन या पुनर्रचित इमारतीची भूमीगत टाकी व पंपरुमची दुरुस्तीचे काम करणे. | ९,९७,३४६/- | ९९७३.०० | २००००.०० | ५९०.०० | दि.०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ७ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली चंद्रोदय या पुनर्रचित इमारतीच्या आतील जिना व सार्वजनिक शौचालयाचे गळती दुरुस्तीचे काम करणे. | ९,९२,०००/- | ९९२०.०० | २००००.०० | ५९०.०० | दि.०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ८ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली \| मंगलमुर्ती या पुनर्रचित इमारतीच्या खोलीतील अंतर्गत प्लॅस्टर पेंटीगची दुरुस्ती करणे आणि शौचालय व बाथरुमचे गळती दुरुस्तीचे काम करणे. | ९,८९,६०८/- | ९८९६.०० | २००००.०० | ५९०.०० | दि.०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ९ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली गुलिस्तान या पुनर्रचित इमारतीच्या वाहेरुन गिलाव्याचे व रंगरंगोटीचे दुरुस्तीचे काम करणे. | ९,९९,२०८/- | ९९९२.०० | २००००.०० | ५९०.०० | दि.०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| १० | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली रामदुत नं. १ व २ या पुनर्रचित इमारतीच्या शौचालयाच्या सिलिंग \| आणि सार्वजनिक शौचालयाचा दरवाजा फिक्स करणे. | ७,६५,६२८/- | ७६५६.०० | १५०००.०० | ५९०.०० | दि.०३/१०/२०२४ ते दि. १२/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ११ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली अनंत निवास या पुनर्रचित इमारतीच्या अंतर्गत संरचनेची दुरुस्ती आणि बाथरुमची गळतीचे दुरुस्ती करणे. | ९,९८,८५७/- | ९९८९.०० | २००००.०० | ५९०.०० | दि.०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| १२ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली लक्ष्मी निवास या पुनर्रचित इमारतीच्या बाहय प्लास्टर आणि पेंटिंगच्या कामाची दुरुस्ती करणे. | ९,९८,५७३/- | ९९८६.०० | २००००.०० | ५९०.०० | दि.०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |

१. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकर सादर करणा-यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रककम ०८ दिवसांच्या आत भरली नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यानी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
२. को-या निविदा म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां विभाग / कें.सा.बां.वि/रेल्वे /बीपीटीए अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणाकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्याए पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
३. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
४. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर सदर करावे.
५. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं.इ. दु. व पु.मंडळ यांच्या नावावर दयावी.
६. को-या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता फ[द] विभाग, फ[द] विभाग तिसरा मजलाए अॅनेक्स बिल्डिंग, म.न.पा. इमारत, परेल, मंबई - १२. यांचेकडून विहित केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे को-या निविदांची विक्री केली जाईल तांत्रिक व आर्थिक लिफाफा हे एका लिफाफामध्ये याच कार्यालयात स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्यतो दि. १५/१०/२०२४ रोजी दुपारी ३. ०० वाजता नंतर कार्यकारी अभियंता, फ[द] विभाग मुं.इ. दु. व पु.मंडळ यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
७. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारजी जाणार नाही.
८. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामचा / वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता [सिव्हिल इंजिनियर] आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
९. उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही.
१०. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकारी सक्षम अधिका-यांकडे ठेवण्यात येत आहे.
११. मागविण्यात आलेली निविदा सन २०२०-२१ च्या एसएसआर वर आधारीत असून, त्यामध्ये जी.एस.टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अदागयी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल
१२. जी. एस. टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

CPRO/A/832 Follow us:@mhadaofficial

**सही/-**
**कार्यकारी अभियंता फ [द] विभाग**
**मुं. इ. दु. व पु. मंडळ**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 102
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - १०२
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

एकच लक्ष्य शहरे स्वच्छ
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर



नरेंद्र मोदी
पंतप्रधान

# नगर विकास विभाग
## महाराष्ट्र शासन

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

## राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना जयंती निमित्त
## विनम्र अभिवादन!

स्वच्छता ही सेवा 2024
17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर, 2024
स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता

## "स्वच्छता ही सेवा" अभियान २०२४
१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४




### - उपक्रम -

**स्वच्छता की भागिदारी : विविध उपक्रम**

- ७९१ ठिकाणी स्वच्छ भारत सांस्कृतिक कार्यक्रम
- ३७४ खाऊ गल्ल्यांमध्ये स्वच्छतेचे उपक्रम
- १९६९ ठिकाणी "एक पेड माँ के नाम" अंतर्गत वृक्षारोपण
- ३६३ ठिकाणी टाकाऊ कचऱ्यापासून टिकाऊ वस्तू / शिल्पांचे प्रदर्शन
- ३७९ ठिकाणी सायकल रॅली / स्वच्छता मॅरेथॉन

**संपूर्ण स्वच्छता**

- १६०२८ नियमित स्वच्छता करण्यात न येणारी अथवा अवघड असलेली ठिकाणे (CTU-Cleanliness Target Units) स्वच्छ करून त्यांचे सौंदर्यीकरण

**सफाई मित्र सुरक्षा शिबिर**

- सफाई मित्रांसाठी एकूण १८७८ शिबीरांचे आयोजन. सुमारे २ लाख ३५ हजार सफाई मित्रांना एक खिडकीद्वारे शासकीय योजनांचा लाभ

४११ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील जवळपास
५४ लाख लोकांच्या सहभागाने
"स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता"





देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

## चला स्वच्छतेच्या कार्यात सहभागी होऊया...महाराष्ट्र स्वच्छ ठेवण्यासाठी हातभार लावूया!!

'दानधर्म' श्रेष्ठ मानणारा समाज कधीही गरिबी नष्ट करू शकत नाही. 'दान' ही गरिबांना गरीब ठेवणाऱ्या 'बफर'ची चतुर आणि क्रूर व्यवस्था आहे.



- ओशो


वृत्तमानस

मुंबई, बुधवार, २ ऑक्टोबर २०२४


## डासांनी केली पंचाईत

गेल्या काही काळात साथरोगांचा प्रसार झपाट्याने होत असताना त्यातील डेंग्यू ने मात्र आता अनेकांची झोप उडविली आहे. आरोग्य यंत्रणेसमोर त्याला कसा आळा घालायचा हा यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे. वाढते नागरीकरण अथवा शहरीकरण, हवामान बदल आणि लोकांच्या स्थलांतर ही डेंग्यूचा प्रसार वाढण्याची तीन प्रमुख कारणे मानली जातात. यंदाच्या पावसाळा हंगामात डेंग्यूने मोठी जीवितहानी केली असल्याचे स्पष्ट झाले आहे. डेंग्यूचा हा कहर वाढत चालला असताना त्याला प्रतिबंध करण्यासाठी अजूनही व्यापक प्रमाणावर प्रयत्न होत नसल्याचे वास्तव आहे. जागतिक पातळीवर डेंग्य इतक्या झपाट्याने पसरला आहे की जागतिक आरोग्य संघटनेच्या अधिकृत आकडेवारीनुसार या वर्षी ऑगस्टपर्यंत जगभरात १२ दशलक्षांहून अधिक प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. त्यात किमान सात हजार जणांच्या मृत्यूची नोंद अधिकृतपणे झाली असली तरी हा आकडा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. धक्कादायक बाब म्हणजे गेल्या वर्षभरात नोंदवलेल्या ५.२७ दशलक्ष प्रकरणांपेक्षा हा आकडा दुप्पट आहे. मागील वर्षापूर्वी गेल्या दशकभरात डेंग्यूची सुमारे दोन ते तीन लाख वार्षिक प्रकरणे नोंदवली गेली होती. याबाबत अनेक तज्ज्ञांचे म्हणणे असे आहे की, यंदाची अधिकृतपणे नोंदविण्यात आलेली ही विक्रमी संख्या असण्याची शक्यता आहे. याचे कारण म्हणजे भारतासह इतरही काही देश त्यांच्या डेटाचा अहवाल जागतिक पातळीवर देत नसल्याने एकूण आकडा किती मोठा असू शकतो याची कल्पना यावी. डेटाचा अहवाल देणाऱ्या देशांमध्येही डेंग्यूच्या प्रत्येक रुग्णाची चाचणी करून आरोग्य अधिकाऱ्यांना अहवाल दिला गेला नसावा, अशी शक्यता असल्याने हा आकडा आणखी मोठा असू शकतो. सर्वसाधारण पावसाळा येताच विविध साथीच्या रोगांच्या रुग्णसंख्येमध्ये वाढ होत असल्याचे पाहायला मिळते. त्यात डेंग्यूच्या साथीचादेखील समावेश असतो. महाराष्ट्रातसुद्धा दरवर्षी डेंग्यूचे रुग्ण मोठ्या संख्येने आढळतात. यंदाही तेच चित्र पाहायला मिळते. डेंग्यू हा रक्त शोषणाऱ्या डासांच्या माध्यमातून होणारा विषाणूजन्य आजार आहे. प्रामुख्यानं डासांची एडिस इजिप्ती ही प्रजाती डेंग्यू पसरवण्यास कारणीभूत असते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे डेंग्यू हा एकमात्र संसर्गजन्य रोग आहे. यामुळे वार्षिक मृत्यू वाढत आहेत, ही बाब चिंताजनक आहे. वास्तविक हा एक विषाणूजन्य संसर्ग आहे. हा रोग रक्त शोषणाऱ्या डासांद्वारे पसरतो. प्रामुख्याने डासांची एडिस इजिप्ती ही प्रजाती हा रोग पसरवण्यास कारणीभूत असते. संसर्गाने ग्रस्त बहुतेक लोकांमध्ये सौम्य लक्षणे दिसून येतात. ताप, तीव्र डोकेदुखी, स्नायू आणि सांधेदुखी, मळमळ आणि उलट्या, डोळयांमध्ये वेदना आणि शरीरावर पुरळ उठणे ही प्रमुख लक्षणे आहेत. गंभीर प्रकरणांमध्ये संसर्गामुळे अंतर्गत रक्तस्त्राव होऊ शकतो आणि वेळेत उपाय न केल्यास मृत्यूदेखील होऊ शकतो. 'द लॅन्सेट'च्या संपादकीयात गेल्या दोन दशकांमध्ये नोंदवलेल्या प्रकरणांमध्ये दहापट वाढ झाली असून, त्याकडे सरकारने आणि आरोग्य विभागाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. डेंग्यूवर ठरावीक असे उपचार किंवा औषध उपलब्ध नाही. डेंग्यूविरोधी लस उपलब्ध असून जागतिक आरोग्य संघटनेने दोन लसींची शिफारस केली आहे. मात्र त्यांना अद्याप भारतात मान्यता मिळाली नसल्याने जीवितहानी वाढतच आहे. एका अधिकृत आकडेवारीनुसार दरवर्षी ४० कोटी लोकांना डेंग्यूची लागण होत असावी असा अंदाज आहे. जगभरात डेंग्यूमुळे दरवर्षी सुमारे किमान ३० हजार मृत्यू होतात आणि यापैकी ७० टक्के रुग्ण आशियातले असून त्यात आपल्या देशाचा समावेश आहे. हे प्रमाण मलेरियामुळे होणाऱ्या मृत्यूंपेक्षा कमी असले तरीही हे आजारपणाचे एक मोठे कारण आहे, एक मोठी समस्या आहे. केवळ सरकारने नव्हे तर लोकांनीसुद्धा याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे असे नेहमी सांगितले जाते. लोकांचा बेफिकीरपणासुद्धा हा रोग वाढविण्यास कारणीभूत ठरत आहे. घरात आणि आजूबाजूला स्वच्छता पाळणे सर्वात महत्त्वाचे असते. डेंग्यूचे डास सामान्यतः दिवसाच चावतात. त्यामुळे तुमच्या आजूबाजूला पाणी साचलेल्या ठिकाणी जाणे शक्यतो टाळणे अथवा त्या साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी उपाययोजना करणे महत्त्वाचे ठरते. घराच्या दारं- खिडक्या बंद ठेवणे, आणि खूप डास असल्यास त्यांची विल्हेवाट लावायला उपाययोजना करणे आवश्यक असते. हे अनेकदा विविध माध्यमांतून सांगितले जात असले तरी लोक त्याकडे कानाडोळा करतात, ही वस्तुस्थिती आहे. प्रत्येक जागरूक नागरिकाने नेहमी दक्ष राहून त्यांच्या घरात किंवा त्यांच्या शेजारी डास तयार होणार नाहीत याबाबत काळजी घेणे गरजेचे ठरते. भांडी, फुलदाण्या, पक्ष्यांसाठी अशा कोणत्याही ठिकाणी पाणी गोळा होऊ नये याची काळजी घेणे आणि डास चावण्यापासून स्वतःचे संरक्षण करणे आवश्यक आहे. यामधून या रोगाचा प्रसार कमी होण्यास मदत होऊ शकते. कोरोनापेक्षासुद्धा हा आजार सध्या जास्त जीवघेणा मानला जात आहे. डेंग्यूमुळे शरीरात प्लेटलेट्सची संख्या कमी होते. साधारणपणे एक घनमिलीलिटर रक्तात १.५ लाख ते ४.५ लाख प्लेटलेट्स असणं गरजेचं असतं. पण डेंग्यूमध्ये या प्रमाणावर सतत लक्ष ठेवावे लागते. या प्लेटलेट्स खूप महत्त्वाच्या ठरतात. दाट लोकसंख्या असलेल्या शहरी भागात हा रोग अधिक वेगाने पसरू शकतो. याचे कारण म्हणजे शहरातील मोकळया जागा एडिस इजिप्ती डासांना प्रजननासाठी पुरेसा अवकाश उपलब्ध करून देतात. हे डास साचलेल्या स्वच्छ पाण्यात प्रजनन करतात ते सामान्यतः पावसाळयात. त्यानंतर या प्रकरणांमध्ये वाढ नोंदवली जाते. हवामानातील बदलामुळे विषाणूंचा प्रसार वाढला आहे. मधल्या काही काळात तापमानात वाढ झाल्यामुळे जी जागा पूर्वी या डासांच्या वाढीसाठी अनुकूल नव्हती आज तिथेही डासांचा जन्म होऊ शकतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. साचलेले पाणी, खराब कचरा व्यवस्थापन आणि डास नियंत्रणाच्या अपुऱ्या पद्धतींमुळे हा विषाणू वेगाने पसरतो. पावसाळयात डासांच्या प्रजननाच्या ठिकाणांची संख्या वाढते. त्यामुळे त्यांच्या प्रसाराचे प्रमाण झपाट्याने वाढते. यासोबतच शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या हीदेखील डेंग्यूच्या वाढत्या रुग्णांची कारणे आहेत. गेल्या दोन महिन्यांत देशातील अनेक शहरांमध्ये डेंग्यूच्या प्रकरणांमध्ये अचानक वाढ झाल्याचे स्पष्ट होते. यंदाच्या जूनअखेरपर्यंत डेंग्यूमुळे ३२ हजारांहून अधिक प्रकरणे नोंदवली गेली आहेत आणि किमान ४० मृत्यूंची नोंद करण्यात आली आहे. गेल्या दोन महिन्यांत ही संख्या आणखी वाढली असल्याचे सांगण्यात येते. चिंतेची बाब म्हणजे गेल्या वर्षाच्या तुलनेत भारतात या वर्षी डेंग्यूच्या रुग्णांमध्ये जवळपास ५० टक्के वाढ झाली आहे. मुख्य म्हणजे भारतातही संसर्गाच्या भौगोलिक क्षेत्रात वाढ होत आहे. हा रोग २००१ मध्ये फक्त आठ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांपर्यंत सीमित होता. दोन वर्षांपूर्वी हा रोग प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात पसरला आहे. याचबरोबर लोकांच्या किंवा वस्तूंच्या स्थलांतरामुळे हे लोक त्यांच्याबरोबर घेऊन जाणाऱ्या संसर्गाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होत आहे. डेंग्यूव्यतिरिक्त, चिकनगुनिया आणि झिका यांसारखे इतर संक्रमणदेखील त्याच वेक्टरद्वारे प्रसारित होत आहेत. २०१६ मध्ये झिकाचा रुग्ण पहिल्यांदा भारत आढळून आला. तेव्हापासून अनेकदा भारतात झिकाचा उद्रेक झाला आहे. एका विषाणूचा संसर्ग झाल्यामुळे वेक्टर डासांची प्रतिकारशक्ती कमी होते का आणि इतर दोन विषाणूंचा संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते का, याबाबतचा अभ्यास करण्याची गरज आहे. एकूणच येत्या काही काळात डेंग्यूच्या या त्रासाकडे वेळीच लक्ष न दिल्यास रुग्ण वाढण्याचा मोठा धोका आहे.

## आला अडाण्याचा गाडा, वाडेवेशी पाडा...

**आनंद शितोळे**
अहमदनगर

शेतकरीद्रोही सरकारच्या धोरणांचे नेमके वर्णन करण्यासाठी हेही अपूरं आहे. सरकारचं नवीन 'राज्यमाता संवर्धन धोरण' प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या मुळावर येणार आहे.

**फक्त शेतकरीच का ?**

दुध व्यवसायाशी संबंधित सगळ्यांच्या मुळावर हे आलेलं आहे. तसंच ते देशी गायींच्या मुळावर आलेलं आहे. सरकारने गाईला राज्यमाता म्हणून घोषित करताना नोंदणीकृत गोशाळेतील गायींसाठी दररोज ५० रुपये याप्रमाणे अनुदान देण्याचे ठरवलेलं आहे.

१. रोजचे पन्नास म्हणजे एका वर्षाचे एका गायीचे १८२५० रुपये. नोंदणीकृत गोशाला आहेत ८२८ आणि गायी आहेत दीड लाखापेक्षा जास्त. वर्षाचा आकडा आहे २७३ कोटींचा. अनुदान आलं म्हणजे गायींची संख्या वाढेल आणि साहजिकच द्विपाद गोपुत्रांना चरायला कुरण मिळेल.

२. सरकारचा दुग्धविकास विभाग दुभत्या गायी घेण्यासाठी कर्ज देतो. मात्र शेतकऱ्याला दुभती गाय घेण्यासाठी त्याच्या वाट्याचे भांडवल उभारायला खाटी गाय विकणे हाच मार्ग असतो. या कायद्याच्या भीतीने गायी कोणी घेत नाही आणि त्यामुळे भाकड गायी रानोमाळ सोडल्या जातात किंवा गोशाळेत दिल्या जातात.

३. गोशाळा चालवणारे समाजातून देणग्या गोळा करतात, पापपुण्याचा हिशोब चोपडीत चोख बसवायला लोक सढळ हाताने पैसे देतात, त्यामुळे या भाकड गायी जगवायला बाजारातून चारा विकत घेतला जातो.

४. चाऱ्याचे उत्पादन मर्यादित आहे, त्यात दुष्काळ असेल तर आणखी वाईट, रानोमाळ फिरणारी भाकड जनावरं कुरणात चरतात त्यामुळे विकतचा चारा बाजारात मागणी पुरवठा नियमाने महाग होतो.

५. गोशाळा अनुदान आणि देणगीवर चालणार असतील तर चाऱ्याचा भाव आणखी वाढणार. परिणामी शेतकऱ्याला चारा विकत घेऊन जनावर जगवणे परवडणार नाही.

६.भाकड जनावर विकली जात नाहीत म्हणून भांडवल नाही, भांडवल नाही म्हणून सरकारची योजना असूनही कर्ज मिळत नाही आणि नवीन गायी घेता येत नाही, जरी धाडस करून घेतल्या तरी चारा विकतचा परवडत नाही, एवढं करून सरकारच्या दुधाच्या भावाची बोंब आहेच.

७. या सगळ्याचा एकत्रितपणे परिणाम म्हणजे देशी गायींची संख्या घटण्यात आहे. कारण मुठभर बेअक्कल, मूर्ख आणि माथेफिरू दोन पायाच्या बैलांच्या हट्टापायी आणि शहरातल्या मध्यमवर्गीय मतदाराच्या तथाकथित धार्मिक भावना गोंजारायला गोवंश हत्याबंदी कायदा आणल्याने देशी गायींचे अस्तित्व धोक्यात आलेलं आहे.


८. राज्यमाता म्हणणे आणि अनुदान वगैरे देणे हा शुद्ध राजकीय निर्णय आहे आणि यांना गायीविषयी काडीचे ममत्व नाहीय. अन्यथा हे दोन पायाचे गोपुत्र एव्हाना यांच्या राज्यमातेला केरळी आणि गोव्याचे लोक, ईशान्य भारतातले लोक कापून खातात म्हणून त्या राज्यात आंदोलन करायला का जात नाहीत ?

९. राज्यमाता, अनुदान आणि हा कायदा, देशी गायींचा अंत पक्का करणाऱ्या आहेत.

## भारत मातेचे थोर सुपुत्र ; लाल बहादूर शास्त्री

भारत मातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची आज जयंती आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता.

१९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना



एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली.

९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. जयंतीदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार,
पुणे

## मध्यमवर्गीय नव श्रीमंतांचं हिंदुत्व...

**शिवराम कार्लेकर**

तूर्तास महाराष्ट्रात हिंदुत्वाचा बोलबोला जोरात आहे. अगदी सामान्य मनुष्याच्या रोजच्या आयुष्यात या हिंदुत्वाचा विषय एकदा तरी येतो. यात नीट अभ्यास केला असता असं दिसून येतं की, हिंदुत्व जास्त नवश्रीमंत वर्गाकडून मांडण्यात येतं. ९० च्या दशकात सुसंस्कृत संस्कारित आयुष्य जगलेल्या मध्यमवर्गाने आधुनिक जगात पॅकेज, वर्ल्ड टूर, विकेंड पार्टी इत्यादीसारख्या गोष्टी अनुभवायला सुरुवात केली. कायमच संस्कारांबद्दल आग्रही असलेला हा वर्ग हळूच हिंदुत्वाच्या आक्रमक पवित्र्यात मग्न झाला. या वर्गाला हिंदुत्व म्हणजे काय, हे नेमकं माहीत नाहीय. 'इस्लामद्वेष' हाच हिंदुत्वाचा पाया आहे. इस्लामद्वेष करताना नेमका इस्लाम सुध्दा यांना माहित नाही. वर जाणून घ्यायची गरजच काय?, असा प्रश्न हेच उपस्थित करतात. मुसलमानांकडे बघा ते कसे कट्टर असतात, असा एक साधारण सूर असतो.

जेव्हा प्रत्यक्षात वेळ येते तेव्हा हे कट्टरत्व प्रत्यक्ष हाच वर्ग आपल्या अंगीकारी बाणवेल, याची शाश्वती नाही. एक डोळा सुखनैव आयुष्याकडे तर दुसरा डोळा या हिंदुत्वाकडे असं काहीसं आहे. बहुतांशी लोकांचा हा देश सोडून नोकरीला बाहेर जायचा प्रयत्न असतो पण दुसरीकडे "राष्ट्र प्रथम" असा काहीसा आव असतो जणू काय राष्ट्राची जबाबदारी यांच्यावरच आहे.

हे हिंदुत्व वैचारिक नाही, इस्लामसारखं आंधळही नाही आणि समाजाला एकत्र करणारंही नाही, थोडक्यात हे वांझोटं आहे. एका राजकीय पक्षाच्या वळचणीला बसून हिंदुत्वासाठीच सारं काही असा फसवा सुर आवळला जातोय. अर्थात ही अवस्था अळवावरच्या पाण्यासारखीच आहे. तूर्तास या पाण्याचा आव मोठ्या मोठ्या बोटी बुडवणाऱ्या समुद्रासारखा आहे.

**(लेखक इतिहास अभ्यासक, व्याख्याते आहेत.)**

## पत्र मानस

### नवरात्रीचे माहात्म्य पाल्यांना सांगा !

'नवरात्री म्हणजे काय ?' असा प्रश्न आताच्या शालेय विद्यार्थ्यांना विचारला तर त्यांच्याकडून नक्कीच उत्तर येईल, 'नवरात्री म्हणजे रात्री उशिरापर्यंत दांडिया खेळणे आणि नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करणे !' खरेतर हिंदू धर्मातील प्रत्येक सणाचे एक वेगळे वैशिष्ट्य असून स्थानपरत्वे तो साजरा करण्याच्या पद्धतीही बदलतात. महाराष्ट्रात त्यातही मुंबई ठाण्यात गुजराती नागरिक मोठ्या संख्येने असल्याने तरुणांवर गरबा आणि दांडियाचा विशेष प्रभाव असल्याचे दिसते. त्यामुळे महाराष्ट्राच्या मातीत तो कसा साजरा करायला हवा याविषयी आजची पिढी अनभिज्ञ असल्याचे लक्षात येते. महाराष्ट्रात घटस्थापना ही प्रधान असते. त्याच्यासमवेत अखंड नंदादीप तेवत ठेवला जातो, काही ठिकाणी त्रिकाळपूजन केले जाते, सुवासिनी नवरात्रीच्या दिवसांत सप्तशती ग्रंथाच्या पाठांचे वाचन करतात, कुमारिकांचे पूजन करून त्यांना भोजन दिले जाते. नऊ दिवस एकभोजनी किंवा निराहार उपवास केला जातो. रात्री देवीचा जागर केला जातो. ललिता पंचमी, महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे), अष्टमीचे होमहवन, सरस्वती आवाहन-पूजन अशा प्रकारचे धार्मिक विधी नवरात्रीच्या निमित्ताने केले जातात. काही ठिकाणी भोंडल्याचे आयोजन केले जाते. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या प्रथा आता राज्यातील काही भागांपुरत्या मर्यादित राहिल्या आहेत. पुढे येणाऱ्या पिढीला नवरात्री हा देवीच्या उपासनेचा उत्सव आहे हेही कदाचित आपल्याला सांगावे लागेल. अशी वेळ येऊ नये म्हणून नवरात्री उत्सवाचे माहात्म्य आणि तो कसा साजरा करावा याविषयीचीचे ज्ञान लहानपणीच आपल्या पाल्यांना द्यावे लागेल.

**- मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

### आशा पारेखाना वाढदिवसाच्या शुभेच्छा

भारतात ज्या दशकात सिनेमा श्रेत्रात महिला अभिनेत्री सहजपणे उपलब्ध होत नसे त्याकाळातील एक सुंदर अभिनेत्रीनी आपल्या सौंदर्याने,उत्तम अभिनयाने आणि कुशल नृत्याने करोडो सिने प्रेक्षकांची मने जिंकली. ज्येष्ठ व लोकप्रिय बॉलिवूड सिने अभिनेत्री आशा पारेख यांचा बालकलाकार ते यशस्वी सर्वश्रेष्ठ अभिनेत्री असा सिनेजगतचा प्रवास थक्क करणारा आहे. त्या काळातील बहुतेक सर्व सुपरस्टार नटा सोबत त्यांनी कामे केली आहेत. त्यांनी भूमिका केलेला जवळपास सर्वच चित्रपटे सुपरहिट ठरली आणि 'अच्छा तो हम चलते है..', 'ना कोई तरंग है मेरी जिंदगी एक कटी पतंग है..'अशा अनेक सदाबहार लोकप्रिय हिंदी गीतांच्या निमित्ताने त्यांनी सिने प्रेषकांच्या मनात कायम स्थान मिळवले आहे. पद्मश्री,फिल्मफेअर,दादासाहेब फाळके इत्यादी अनेक सर्वोच्च पुरस्काराने अभिनेत्री आशा पारेख सन्मानित झाल्या आहेत. भारतीय सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्ष पदी देखील त्या होत्या. त्या अविवाहित आहेत व त्यांचे सामाजिक श्रेत्रातही योगदान आहे. असे म्हटले जाते की चित्रपट चित्रकरणी दरम्यान त्यांना सहसा कधीच रिटेक द्यावा लागत नसे इतक्या त्या आपल्या कामाशी एकरुप असतात. अशा आपल्या श्रेत्रात प्रचंड यश संपादन केलेल्या लोकप्रिय अभिनेत्री आशा पारेख याना त्यांच्या वाढदिवस दोन ऑक्टोबर निमित्ताने मनःपूर्वक शुभेच्छा !

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### प्रतिभेला प्रोत्साहन देण्याचा योग्य निर्णय

सर्वोच्च न्यायालयाने विशेषअधिकाराचा वापर करत आणि आयआयटी प्रशासनावर नाराजी व्यक्त करत दलित विद्यार्थ्याला आयआयटीत प्रवेश दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे. एका मजुराचा मुलगा 'अतुल कुमार' मोठ्या कष्टाने जेईई परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्याला 'धनबाद'मध्ये इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरिंग विभागातील त्याला सीट मिळाली होती.पण गरीबीमुळे हा तरुण आयआयटीचे शुल्क भरू न शकल्याने सीट रद्द केली होती. झारखंड आणि मद्रास उच्च न्यायालयाने या विद्यार्थ्याला न्याय मिळवून देण्यास मदत केली पाहिजे होती.राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने या विद्यार्थ्याला मदत करण्यास असमर्थता का दर्शवली? देशात अशा गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करण्या-या बँका किंवा संस्था अस्तित्वात नाहीत का? देशात आरक्षण देखील अशा विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. गरीब व दलित विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता वाया जाता कामा नये. अनामत शुल्कासाठी गावातल्या लोकांनी त्याला मदत केली. अशावेळी स्थानिक नेत्यांनी किंवा उद्योगपती का मदत केली नाही?

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### बातमीचा आवाज हरपला

समाजातील दुर्बल, दुर्लक्षित आणि समाजातील उन्नतीसाठी वृत्तपत्र लेखन करणारा सिंधुदुर्गातील, कणकवली ,ओसर गावचा सुपुत्र श्री नितीन शांताराम चव्हाण यांचे वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षी आज ,मंगळवार, दिनांक १ ऑक्टोबर २०२४ रोजी पहाटे ३.३० वाजता निधन झाले.नितीन, मुंबई वास्तव करीत असताना त्यांनी वृत्तपत्र लेखन सुरू केले.मराठी वृत्तपत्र लेखक संघांचे ते क्रियाशील सदस्य होते ,संघाचे कोषाध्यक्ष पद भूषविले होते.पुढे त्यांनी वार्ताहर म्हणून मुंबई तरूण भारत, सकाळ, सामना दैनिकात काम केले.२७ वर्षाच्या पत्रकारितेत त्यांनी महाराष्ट्र टाईम्स दैनिकात १५ वर्षे वार्तांकन केले पुढे ते म.टा.चे विशेष प्रतिनिधी म्हणून कार्यरत होते.तब्बल २० वर्षे मुंबई महापालिकेतील वार्तांकन केले.मुंबई महापालिकेतील दैनंदिन घडणार्या प्रशासकीय व राजकीय घडामोडींवर त्यांचे विशेष लक्ष असे.बातमीचा माग काढण्याचे त्यांचे सुत्र वाखणण्याजोग होते.त्यांच्या बातमीने प्रशासकीय व राजकीय खळबळ उडवून देत असत. कुर्ल्यातील गांधी मैदानावरील अतिक्रमण हटवण्यासाठी कुर्ला जेष्ठ नागरिक संघ सतरा वर्षे न्यायालयीन लढाई लढले,पुढे जिंकले पण अतिक्रमण मुक्त गांधी मैदान होत नव्हते लढाई लढणारे तरूण ८५ ते ९० वयोगटातील होते.सदर बाब मी नितीनच्या निदर्शनास आणून दिली.नितीने दखल घेऊन महाराष्ट्र टाईम्स मधुन प्रसिद्धी देताच मुंबई तत्कालीन उपनगर जिल्हाधिकाऱ्यानी दखल घेऊन २९ बांधकामे निष्कासित करण्याचे आदेश दिले.अडीच हजार चौरस मीटर जागा पुढे मुंबई महापालिकेला जिल्हाधिकाऱ्यानी हस्तांतरित केली.अशा हरहुन्नरी पत्रकारास आम्ही मुकलो आहोत. नितीनच्या जाण्याने बातमीचा आवाज हरपला आहे ,भावपूर्ण आदरांजली.

**- महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**

### निर्णयसंख्येवर बंधने असावीत

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने सोमवारच्या मंत्रीमंडळ बैठकीत जवळपास ४० निर्णय केवळ दोन तासात घेतले. सोमवारीच दिवसभरात १७१ शासन निर्णय राज्य सरकारतर्फे जाहीर करण्यात आले. निवडणूक आचारसंहिता लागू होण्यापूर्वी आणखी मंत्रीमंडळ बैठका होऊन अजून काही निर्णय घेतले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आतापर्यंतचा इतिहास पाहता बहुतेक सर्वच राज्यात निवडणूकपूर्व निर्णयांची अशीच घिसाडघाई होत असते. आचारसंहितेपूर्वी विद्यमान सरकार लोकानुनयी निर्णय, घोषणांचा पाऊस पाडते. जेणेकरुन मतदारांवर प्रभाव पडावा. निवडणूक आयोगाने ही बाब लक्षात घेऊन अशा निर्णयांवर, घोषणांवर मर्यादा आणणे गरजेचे आहे. तसे आचारसंहिता काळात निवडणूक आयोगाकडून राजकीय पक्षांवर बंधने आहेत. पण आचारसंहिता लागू होण्यापूर्वीही निवडणूक आयोगाने निर्णयसंख्या निश्चित करणे आवश्यक आहे.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

# विशेष भू-संपादन अधिकारी कार्यालय
# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

विशेष भूसंपादन अधिकारी गृहनिर्माण भवन कक्ष क्र. ३३७ दुसरा मजला, कलानगर वांद्रे (पू) मुंबई ५१. दुरध्वनी ०२२-६६४०५२१८.

म्हाडा MHADA

जा.क्र. विभुसं/ (दक्षिण)/८७/२०२४ — दिनांक:- ३०/०९/२०२४

**महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास अधिनियम १९७६ च्या कलम ९३[३] आणि ९३ [४] प्रमाणे**

## नोटीस

**वाचले :**

१) कार्यकारी अभियंता/फ[दक्षिण) मुंबई दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ यांचा प्रस्ताव जावक क्र. /१९० / २०२४ दिनांक- ०५/०७/२०२४
२) गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक विमंका - २०१९ / प्र.क्र. १४८ [ भाग - १ ) / दुवपु-१ दिनांक- २२/०८/२०२३
३) शासन निर्णय क्रमांक जमिन संपादन- २०१२/प्र.क्र. ७४ / दुवपु-१ दिनांक- ११/०१/२०२४

सदर मिळकत भूकर पाहणी क्र. १/११२ परेल शिवडी विभाग, इमारत क्र. ७५ ७५ए आणि ७५बी, उपकर क्र. एफएस-१०५२ [४बी] आणि फ/दक्षिण- १०५२[५-६] डॉ. एस. एस. राव रोड, लालबाग, मुंबई "पानवाला चाळ नं. २ आणि ३" म्हणून ओळखली जाणारी इमारत मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु. मंडळ यांनी पत्र क्र. F-१५७२ / ४०२४ / दुबपु दि. १२/०९/२००८ रोजी पुनर्विकासासाठा ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे. आणि सुधारीत नाहरकत प्रमाणपत्र क्र. R/NOC/F- १५७२ / दुवपु दि. २२/०३/२०१० अन्वये प्रदान केलेले आहे.

आणि ज्या अर्थी मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी सदरच्या जमिनीबाबत म्हाडा अधिनियम १९७६ च्या कलम ९१ (अ) अन्वये पुनर्विकास प्रकल्प बांधकामासहीत संपादन करणेबाबत व सक्तीने संपादन करण्यासंबंधी आदेश काढला जावा म्हणून महाराष्ट्र शासनाला दि. १८/०८/२०२३ आणि २१/१२/२०२३ अन्वये प्रस्ताव सादर केला.

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाच्या म्हाडा अधिनियम १९७६ च्या कलम ९१ [अ] आणि ९३ [१] अन्वये उपरोक्त प्रस्तावास अर्धवट अवस्थेमधील पुनर्विकास प्रकल्प पूर्ण करण्याकरीता प्रकल्पांतर्गत मालमत्ता व भूखंड क्षेत्र १२९४.३३ चौ.मी. व त्यावरील बांधकाम महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्रमांक जमिन संपादन- २०१९/प्र.क्र. ७४ / दुवपु-१ दिनांक ११/०१/२०२४ अन्वये मान्यता दिली.

आणि आता कलम ९३ पोटकलम [३] आणि [४] अन्वये मला ज्या शक्ती / अधिकार प्रत्यायोजित /प्रदान करण्यात आलेल्या आहेत, त्या शक्तीचा / अधिकारांचा वापर करून मी खालील सही करणार अजित देशमुख, विशेष भूसंपादन अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ नोटीस देतो की, शासन निर्णय क्रमांक जमिन संपादन- २०१९/प्र.क्र.७४ / दुवपु-१ दिनांक- ११/०१/२०२४ अन्वये शासनाने संपादनाच्या उक्त प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. कलम ९३ पोटकलम [५] अन्वये उक्त जागा मोकळी करणे व त्याचे सक्तीने बांधकामासहीत संपादन करणे याबाबत जो आदेश काढला जाईल व तो ज्या तारखेस प्रवर्तीत होईल त्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत उक्त जमिनी मोकळ्या केल्या पाहिजेत. उपलब्धतेनुसार आणि भाडेकरू / रहिवाश्यांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतरच पर्यायी निवास व्यवस्था प्रदान केली जाईल. सदर मिळकत /जमिनीचे भोगवटादार, मालक, विकासक, पट्टेदार आणि गहाणदार [असल्यास] यांना याद्वारे कळविण्यात येते की, संपादनाच्या प्रस्तावासंबंधी आणि अशा जमिनी बांधकामासहीत [असल्यास) का संपादन करण्यात येऊ नये. या संबंधी आपले कोणतेही आक्षेप व सूचना असल्यास (दोन प्रतीत दि.२२/१०/२०२४ पर्यंत अथवा त्या आधी मिळतील अशा बेताने कार्यकारी अभियंता/फ [दक्षिण] यांच्या कार्यालयात सादर कराव्यात.

**टीप -** शासनाने मान्य केलेला संपादनाचा प्रस्ताव लोकांना पाहण्यासाठी कार्यकारी अभियंता फ/दक्षिण, विभाग मुं.इ.दु.व पु. मंडळ, ॲनक्स बिल्डींग, बीएमसी बिल्डींग, ३रा मजला, किर्ती महल हॉटेलच्या वर, परेल, मुंबई-१२ येथे शनिवार, रविवार व इतर सुट्टीचे दिवसाखेरीज कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आलेला आहे.

### अनुसुची 'अ'

"भुकर पाहणी क्र. १/११२ परेल शिवडी विभाग, इमारत क्र. ७५ ७५९ आणि ७५बी, उपकर क्र. फ/दक्षिण-१०५२[४वी] आणि फ/दक्षिण-१०५२[५-६] डॉ. एस. एस. राव रोड, लालबाग, मुंबई- १२ येथील "पानवाला चाळ क्र. २ आणि ३" येथील मालमत्ता व भूखंडाचे क्षेत्र १२९४.३३ चौ. मी."
तारीख :

### अनुसुची 'ब'

**भाडेकरु / रहिवाशी यांची प्रमाणित यादी.**

**Redevelopment of property at C.S. No. 1/112 of Parel Sewree Division**

Statement Showing the Details of Tenant / Occupant in building No. 75B Panwala Chawl No. 3, Dr. S. 8. Rao Road, Lalbaug, Mumbai 400 012. Cess No. FS-1062 (5-6) for the proposed redevelopment under DCR 33(7)

| SR NO | NAME OF THE TENANT | NAME OF THE OCCUPANT | FLOOR | SHOP/ ROOM NO. | USER N/R | CARPET AREA IN SQ MT | BUA IN SQ. MT. | COMMON AREA IN SQ MT | BALCONY AREA IN SQ MT | TOTAL BUA IN SQ MT | WHETHER CONSENT STAYING IN BLDG OR OTHTERWISE YES/NO | WHETHER OCCUPANT GIVEN OR OTHTERWISE YES/NO | WHETHER ROOM IS REFLCTED IN MCGM EXTRACT OF 95-96 YES/NO | WHETHER ROOM TALLY WITH OLD BLDG PLAN YES/NO | WHETHER FOLLOWING DOCUMENT PRIOR TO 13.06.96 ARE AVAILABLE AND KEPT ON RECORD IN REFLCTED OF ROOM YES/NO | | | ANY OTHER DOCUME NTS PRIOR TO 13.05.96 RENT RECIEPT | DECISION FOR TENANCY ACCEPTED /IF REJECTED WITH REASION | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | Electrical Bill | Ration Card | Voter List | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | | | 17 | 18 | 19 |
| 1 | Mr. Shrirang Tukaram Jadhav | Smt. Shobhana Shrirang Jadhav | Gr. Fir. | Room 1 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec 07 | Yes Nov. 86 | Yes 1995 | Mar. 03 Nov. 93 Mar. 08 (Tel) | Yes | |
| 2 | Mr. Vasant Mahadeo Mirashi Patel | Mr. Vasant Tatu Dipaji | Gr. Fir | Room 2 | R | 10.78 | 12.99 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Mar 92 Feb. 08 | Yes Jan. 71 | Yes 1995 | Feb. 93 Mar 08 | Yes | |
| 3 | Mr. Shankar Shambu Shetye | Mr. Jaywant Bhikaji Chavan | Gr. Fir | Room 3 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Feb. 08 | Yes Aug. 96 | Yes 1995 | Jul. 86 Mar. 08 Feb. 08 (Tel) | Yes | POA of tenant attachled |
| 4 | Mr. Pandurang Baburao Sarang | Mr Dayanand Pandurang Sarang | Gr. Fir. | Room 4 | R | 10.78 | 12 98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Mar. 95 Aug. 07 | Yes Jan. 94 | Yes 2007 | Nov. 89 Mar. 08 | Yes | |
| 5 | Mr. Maruti Atmaram | Mr. Parvati Sahadev. Bane | Gr. Fir. | Room 5 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Feb. 86 Aug. 07 | No | No | Sep. 94 Sep. 07 | Yes | |
| 6 | Mr Tukaram Krishna Jogal | Mr. Laxman Tukaram Jogal | Gr. Fir | Room 6 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Jun. 95 Feb. 08 | Yes Dec 90 | Yes 1995 | Aug.74 Dec. 07 | Yes | |
| 7 | Mr. Dnyandev Shahu Narkar | Mr. Vijay Dnyandev Narkar | Gr. Fir | Room 7 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 73 Apr. 07 | Yes Dec 66 | Yes 1995 | Jan 95 Sep 07 | Yes | |
| 8 | Mr. Dhondiram Laxman | Mr. Prakash Vasant Jamsandekar | Gr. Fir. | Room 8 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Apr. 95 Feb. 08 | Yes Jul 92 | Yes 1995 | Jan 95 Sep 07 | Yes | |
| 9 | Mr. Sharad Chintaman Dolas | Mr. Sachin Sharad Dolas | Gr. Fir. | Room 9 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Mar. 95 Feb 08 | No | No | May94 Sep.07 Oct. 05 (Tel) | Yes | |
| 10 | Mr. Vishram Bhadu Raikar | Mr, Arun Tukaram Rane | Gr. Fir. | Room 10 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Jan. 08 | Yes Jul 66 | Yes 1995 | Dec.94 Sep.07 Feb. 08 (Tel) | Yes | |
| 11 | Smt. Laxmibai Chandu Dhobi | Mrs. Saraswati Ganpat Patil | Gr. Flr. | Room 11 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Mar. 95 Feb. 08 | Yes Nov. 92 | No | Jul. 95 Nov. 07 Oct. 05 (Tel) | Yes | |
| 12 | Mr Rajendra Gathe | Smt. Sushila Dattatray Dattatray Gathe Mr. Ravindra Dattatray Gathe | Gr. Flr. | Room 12 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Oct. 94 Feb. 08 | Yes Dec. 66 | Yes 2007 2007 | Jul. 95 Mar. 08 | Yes | |
| 13 | Mr. Dilip Raghunath Dolas | Mr. Dilip Raghunath Dolas | Gr. Flr. | Room 13 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Apr. 89 Feb. 08 | Yes Mar. 89 | Yes1995 | Feb. 89 Sep. 07 | Yes | |
| 14 | Mr. Devji Krishna Bhuvad | Mr. Babu Kerba Kesarkar | Gr. Flr. | Room 14 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Feb. 08 | Yes Aug. 07 | No | Sep. 87 Dec. 07 | Yes | |
| 15 | Mr. Tatoba Dhondu Delekar | Mr Maruti Tatoba Devekar | Gr. Flr. | Room 15 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | May 94 Dec. 07 | Yes Dec. 66 | Yes 1996 | Feb. 99 Dec. 07 | Yes | |
| 16 | Mr. Dattatray Laxman Sathale | Mr. Dattatray Laxman Sathale | Gr. Flr. | Room 16 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 72 Feb. 08 | Yes Dec. 68 | Yes 1995 | Sep. 92 Jul 07 | Yes | |
| 17 | Mr. Balwant Karsandas Chawda | Mr. Balwant Karsandas Chawda | Gr. Flr. | Room 17 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | May 2000 Feb. 08 | Yes May 86 | Yes 1995 | Sep. 86 Mar. 08 | Yes | |
| 18 | Mr. Mahipat Bapu Kadam | Mr. Mahipat Bapu Kadam Mr. Mayur Mahipat Kadam | Gr. Flr. | Room 18 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Aug. 95 Feb. 08 | Yes Apr 93 | Yes 1995 No | Sep. 95 Dec. 07 | Yes | |
| 19 | Mr. Hari Babaji Patil | Mr. Balu Dattu Kotkar | Gr. Flr. | Room 19 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Different Name | Yes May 88 | Yes 1995 | Dec. 86 Apr. 01 | Yes | |
| 20 | Mr. Nathuram Shankar Patange | Mr Mahendra Nathuram Patange | Gr. Flr. | Room 20 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Different Name | Yes Mar. 85 | Yes 1995 | Oct. 95 Sep. 07 | Yes | |
| 21 | Mr. Vithal Dhondu Metri | Mr. Arjun Janardan Dalvi | Gr. Flr. | Room 21 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Feb. 08 | Yes Dec. 88 | Yes 1995 | Feb. 79 Mar. 08 Oct. 06 (Tel) | Yes | |
| 22 | Mr. Sadashiv Aba Mungekar | Mr. Ghanshyam Sadashiv Mungekar | Gr. Flr. | Room 22 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Aug. 96 Jan. 08 | Yes Dec. 66 | Yes 1995 | Mar. 96 Feb. 07 | Yes | |
| 23 | Mr. Sakharam Laxman Mungekar | Smt. Aparna Ashok Patkar | Gr. Fir. | Room 23 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Different Name | No | No | Jun. 78 Dec. 07 | Yes | Affidivite attached |
| 24 | Mr. Narendra Atmaram Chavan | Mr. Prakash Atmaram Chavan | Gr. Flr. | Room 24 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Feb. 08 | Yes Jul. 66 | Yes 1995 | May. 96 Mar. 06 Jul. 07 (Tel) | Yes | |
| 25 | Mr. Dinkar Pandurang Rane | Smt. Anusaya Dinkar Rane Mr. Chandrakant Dinkar Rane | Gr. Flr. | Room 25 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | NO | YES | YES | -- | Yes Dec 98 | No | -- | Yes | |
| 26 | Mr. Kashinath Vithoba | Smt. Ratnaprabha Ratnakar Tamhanekar Mrs Sunita Madhukar Tamhankar | Gr. Fir. | Room 26 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Mar. 96 Feb. 08 | Yes Dec. 87 | Yes 1995 No | Dec. 95 Sep. 07 | Yes | |
| 27 | Mr. Mahadeo Nilu Joshi | Mr. Prabhakar Mahadeo Joshi | Gr. Fir. | Room 27 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 85 Feb. 08 | Yes May 88 | Yes 1995 | Nov. 62 Aug. 93 Sep. 07 Dec. 90 (Tel) Feb. 08 (Tel) | Yes | |
| 28 | Mr. Ramachandra Punaji Pawaskar | Mr. Shantaram Ramchandra Pawaskar | Gr. Flr. | Room 28 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 95 Jan. 08 | Yes Nov. 2000 | Yes 1995 | Jun. 96 Mar. 08 Feb. 08 (Tel) | Yes | |
| 29 | Mr. Krishna Raoji Kothavale | Mr Suhas Daji Kothawale | Gr. Flr. | Room 29 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Oct. 95 Jan. 08 | Yes Oct. 95 | Yes 1995 | Jun. 95 Dec. 07 Dec. 06 (Tel) | Yes | |
| 30 | Mr. Sitaram Mahadu | Mr. Suresh Laxman. Parab | Gr. Fir. | Room 30 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 93 Feb. 08 | Yes May 91 | ON | Jan. 94 Sep. 07 Oct. 07 (Tel) | Yes | |
| 31 | Mr. Prabhakar Vishnu Ghosalkar | Mr. Phabhakar Vishnu Ghosalkar | 1st Flr. | Room 31 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 95 Mar. 08 | Yes Feb. 93 | Yes 1996 | Jan. 95 Dec. 07 | Yes | |
| 32 | Mr. Ganpat Gurav | Mrs. Sunita Krishna Jadhav | 1st Flr. | Room 32 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Feb. 08 | Yes Dec. 66 | Yes 1995 | Feb. 94 Mar. 06 | Yes | |
| 33 | Mr. Shivram Gangaram Salunkhe | Smt. Prabhavati Shivram Salunkhe | 1st Flr. | Room 33 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 94 Feb. 08 | Yes Feb.88 | Yes 1995 | Mar. 08 | Yes | |
| 34 | Smt. Sakhubai Sakharam Bhuvad | Mr. Shantaram Sakharam Bhuvad | 1st Flr. | Room 34 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Jul. 93 Dec. 07 | Yes Mar. 87 | Yes 1995 | Dec. 92 Jan 08 | Yes | |
| 35 | Mr. Ashok Waman Metri | Mr. Ashok Waman Metri | 1st Flr. | Room 35 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | -- | Yes May 92 | No | -- | Yes | |
| 36 | Mr. Laxman Tukaram Chalke | Mr. Laxman Tukaram Chalke | 1st Flr. | Room 36 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Sep. 94 Feb. 08 | Yes Jan. 91 | No | Feb. 92 Mar. 06 | Yes | |
| 37 | Mr. Pandharinath Jaganath Deokar | Smt Prajakta Prakash Deokar | 1st Flr. | Room 37 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 93 Dec. 07 Tenant | Yes Mar. 94 | Yes 1995 | Mar. 95 Jan. 08 Nov. 97 Dec 06 (Tel) | Yes | |
| 38 | Mr Laxman Dadu Pangam | Mr. Tanaji Dadu Pangam | 1st Flr. | Room 38 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | -- | Yes Jul. 86 | Yes 1995 | Mar. 95 Mar.08 | Yes | Affidivite of tenant attached |

...जाहीरात पान ६ वर

# विशेष भू-संपादन अधिकारी कार्यालय
## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

विशेष भूसंपादन अधिकारी गृहनिर्माण भवन कक्ष क्र. ३३७ दुसरा मजला, कलानगर वांद्रे (पू) मुंबई ५१. दुरध्वनी ०२२-६६४०५२१८.

म्हाडा MHADA

**Redevelopment of property at C.S. No. 1/112 of Parel Sewree Division**

Statement Showing the Details of Tenant / Occupant in building No. 75B Panwala Chawl No. 3, Dr. S. 8. Rao Road, Lalbaug, Mumbai 400 012. Cess No. FS-1062 (5-6) for the proposed redevelopment under DCR 33(7)

| SR NO | NAME OF THE TENANT | NAME OF THE OCCUPANT | FLOOR | SHOP/ ROOM NO. | USER N/R | CARPET AREA IN SQ MT | BUA IN SQ. MT. | COMMON AREA IN SQ MT | BALCONY AREA IN SQ MT | TOTAL BUA IN SQ MT | WHETHER CONSENT STAYING IN BLDG OR OTHTERWISE YES/NO | WHETHER OCCUPANT GIVEN OR OTHTERWISE YES/NO | WHETHER ROOM IS REFLCTED IN MCGM EXTRACT OF 95-96 YES/NO | WHETHER ROOM TALLY WITH OLD BLDG PLAN YES/NO | WHETHER FOLLOWING DOCUMENT PRIOR TO 13.06.96 ARE AVAILABLE AND KEPT ON RECORD IN REFLCTED OF ROOM YES/NO | | | ANY OTHER DOCUMENTS PRIOR TO 13.05.96 RENT RECIEPT | DECISION FOR TENANCY ACCEPTED /IF REJECTED WITH REASION | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | Electrical Bill | Ration Card | Voter List | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | | | 17 | 18 | 19 |
| 39 | Mr. Anagha Arvind Dalvi | Mrs. Anagha Arvind Dalvi | 1st Flr. | Room 39 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Nov. 98 | Yes Feb. 94 | Yes 2007 | Jul. 98 Mar. 08 | Yes | |
| 40 | Mr. Prabhakar Balkrishna Gawade | Mr. Prabhakar Balkrishna Gawade | 1st Flr. | Room 40 | R | 10.78 | 12.99 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Mar. 95 | Yes Nov. 93 | Yes 1995 | Jan. 95 Mar. 08 Feb. 08 (Tel) | Yes | |
| 41 | Mr. Balkrishna Shivram Rasal | Mrs. Pratima Prakash Rasal | 1st Flr. | Room 41 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Sep. 94 Feb. 08 | Yes Aug. 92 | Yes 2007 | Jul. 94 Mar. 08 Feb. 08 (Tel) | Yes | Affidivite 2 numbers attached |
| 42 | Mr. Balkrishna Shivram Rasal | C/o Kalgi Tura Samaj Unnatti Mandal Mr. Chandrakant Govind Lad | 1st Flr. | Room 42 | R | 10.78 | 12 98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Sep. 94 Nov. 07 (Tenant) | -- | NO | Sep. 94 Jan. 08 Mar. 08 (Tel) Kalgitura | Yes | Minute of society attached |
| 43 | Mr. Dattatray Maruti Desai | C/o Ajinkya Tara Sahakari Pata Sanstha Maryadit Mr. Vittal Tukaram Telang Mr. Subhash Anant More | 1st Flr. | Room 43 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | NO | YES | YES | -- | -- | -- | -- | Yes | |
| 44 | Mr. Raghunath Malhari Patil | Mr. Arun Raghunath Patil | 1st Flr. | Room 44 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Jul. 93 Feb. 08 | Yes Feb. 08 | Yes 1996 | Jan. 94 Mar. 07 | Yes | Affidivite of tenant attached |
| 45 | Mr. Krishna Tukaram Tetambe | Shri Krishna Tukaram Tetambe | 1st Flr. | Room 45 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Oct. 95 Jan. 08 | Yes Jan. 86 | Yes 1995 | Aug. 94 Dec. 07 | Yes | |
| 46 | Mrs. Chhaya Chandrakant Kudatarkar | Mrs. Chhaya Chandrakant Kudatarkar | 1st Flr. | Room 46 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 95 Feb. 08 | Yes Dec. 92 | Yes 1995 | May 93 Sep. 07 | Yes | |
| 47 | Mr. Narayan Mahadeo Mhaskar | Mr. Mahadev Laxman Mhaskar | 1st Flr. | Room 47 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | NO | YES | YES | -- | Yes Apr. 90 | No | Jan. 08 | Yes | Affidivite 2 numbers attached |
| 48 | Mr. Mahadeo Vithal Lad | Smt. Parvati Mahadeo Lad | 1st Flr. | Room 48 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Feb. 96 Feb. 08 | Yes Jan.90 | No | Apr. 96 Mar. 08 | Yes | |
| 49 | Mr. Vijay Dattatram Jadhav | Mr. Vijay Dattaram Jadhav | 1st Flr. | Room 49 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Nov. 92 Feb. 08 | Yes Dec. 80 | Yes 1995 | Jun. 94 Mar. 06 Feb. 08 (Tel) | Yes | |
| 50 | Mr. Panduranag Bhagoji Parab | Mr. Pandurang Bhagoji Parab | 1st Flr. | Room 50 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | -- | -- | No | -- | Yes | |
| 51 | Smt Mangala Damodar More | Mr. Shakil Damodar More | 1st Flr. | Room 51 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Aug. 93 Feb. 08 (Father) | No | No | Mar. 96 Mar. 08 | Yes | |
| 52 | Mr. Ganu Rama Tambe | Mr Anant Ganu Tambe | 1st Flr. | Room 52 | R | 10.78 | 12.99 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Aug. 95 Jan. 08 | Yes Nov. 2000 | Yes 1995 | Oct. 95 Dec. 07 | Yes | |
| 53 | Mr. Suresh Dhondu Dange | Mr. Suresh Dhondu Dange | 1st Flr. | Room 53 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Oct. 93 Jan. 08 | Yes Jan. 83 | Yes 1995 | Jul. 95 Jan. 08 Mar. 08 (Tel) | Yes | |
| 54 | Mr. Janardan Sadashiv Chavan | Mr Nandu Janardan Chavan | 1st Flr. | Room 54 | R | 10.78 | 12 98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | May 80 Feb. 08 (Tenant) | Yes Aug. 75 | Yes1995 | Mar. 93 Sep. 07 Feb. 08 (Tel) | Yes | |
| 55 | Mr. Pandurang Dhonu | Mr. Chandrakant Govind Lad | 1st Flr. | Room 55 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Mar. 08 | Yes Dec. 66 | Yes 1995 | Mar. 95 Mar. 08 | Yes | |
| 56 | Mr. Keshav Gaoroji Chavan | Smt. Laxmibai Tukaram Chavan | 1st Flr. | Room 56 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 95 Jan. 08 | Yes Jan. 93 | Yes 1996 | Jun. 96 Feb. 07 | Yes | |
| 57 | Mr. Raghunath Pundalik Dalvi | Mr. Sunil Raghunath Dalvi | 1st Flr. | Room 57 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 94 Feb. 08 | Yes Feb. 98 | Yes1995 | Jan. 96 Jan. 08 Feb. 08 (Tel) Brother | Yes | |
| 58 | Mr. Tukaram Mhadu | Smt. Hirabai Ishwar Desai | 1st Flr. | Room 58 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Dec. 93 | Yes Mar. 92 Yes 1995 | | Aug. 93 | Yes | |
| 59 | Mrs. Vijayshree Vijay Sawant | Mrs. Shraddha Vinayak Mistri and Ms. Bhakti Vijay Sawant | 1st Flr. | Room 59 | R | 10.78 | 12.98 | 5.35 | -- | 18.33 | YES | YES | YES | YES | Oct. 88 Feb. 08 (Tenant) | -- | No | Oct. 94 Jan. 06 | Yes | D.C. of tenent and affidivite attached |
